जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2024
लोकमत

# विद्यापीठास २० कोटींचा निधी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : केंद्र सरकारच्या उच्चतर शिक्षा अभियानाच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठाला २० कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे. देशभरातील शैक्षणिक संस्था, विद्यापीठांकडून पीएम उषा योजनेंतर्गत पायाभूत सुविधा आणि संशोधनासाठी गतवर्षी प्रस्ताव मागविले होते. यातून प्रस्तावांची छाननी करून संबंधित विद्यापीठांना अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

राज्यातील २१ संस्थांमध्ये छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, गडचिरोलीतील गोंडवाना विद्यापीठ, एसएनडीटी महिला विद्यापीठ, सोलापुरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाला प्रत्येकी १०० कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले, तर शिवाजी विद्यापीठासह इतर विद्यापीठ व संस्थांना २० कोटी रुपये अनुदान मंजूर झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज मंगळवारी सकाळी ११ वाजता पीएम उषा या योजनेचे उद्घाटन होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2024
लोकमत

# मुद्रा योजनेवर आज कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ डेव्हलपमेंटच्या वतीने 'प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे प्रभाव मूल्यांकन: पश्चिम महाराष्ट्रातील अंतर्दृष्टी' या विषयावर आज मंगळवारी कार्यशाळा होणार आहे. अर्थशास्त्र विभागातील सेमिनार हॉलमध्ये सकाळी १०:३० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानवशास्त्र शाखेचे अधिष्ठाता प्रा.डॉ.एम.एस. देशमुख असतील.

आरशेती कोल्हापूरचे संचालक कुलभूषण उपाध्ये, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक गणेश गोडसे, प्रा.डॉ.विद्या कट्टी, डॉ.प्रतिमा पवार आणि डॉ.नितीन माळी हे मुद्रा योजनेबाबतच्या विषयावर मार्गदर्शन करतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2024

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात ऑनलाइन एम. बी. ए.

## महाराष्ट्रातील एकमेव दूरशिक्षण केंद्र

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : 'नॅक'चे 'ए' मानांकन प्राप्त झाल्यानंतर शिवाजी विद्यापीठ हे विद्यापीठ अनुदान आयोगाचे विविध ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्यास पात्र झाले आहे. आयोगाच्या मान्यतेनुसार, आता विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रामार्फत येत्या शैक्षणिक वर्षापासून ऑनलाइन एम. बी. ए.चा अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. असे केंद्र असणारे विद्यापीठ हे राज्यातील एकमेव दूरशिक्षण केंद्र असेल.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिलेल्या माहितीनुसार, नॅक 'ए' मानांकनप्राप्त असल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेने एम. बी. ए., एम. कॉम., एम. एस्सी (गणित), एम. एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) आदी अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्यास शिवाजी विद्यापीठ पात्र ठरले. हे अभ्यासक्रम सुरू करण्याची कार्यवाही विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रातर्फे सुरू आहे. यातील ऑनलाइन एम. बी. ए. अभ्यासक्रम सुरू करण्यास विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यामुळे ऑनलाइन एम. बी. ए.चा अभ्यासक्रम सुरू करणारे शिवाजी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव राज्य विद्यापीठ ठरले आहे.

या ऑनलाइन अभ्यासक्रमासाठी सुसज्ज अशा लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीमद्वारे विषयतज्ज्ञांनी विकसित केलेले व्हिडीओ लेक्चर्स, ई-बुक्स, लाइव्ह कौन्सिलिंग सेशन, प्रॅक्टिस टेस्ट आदी सामग्री प्रवेशित उपलब्ध करणार आहे. तसेच विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून त्यांना पुढील रोजगार संधींचा लाभही घेता येईल. ऑनलाइन एम.बी.ए. अभ्यासक्रमाचा इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभ घेण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन डॉ. शिर्के यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2024

पुढारी

# छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती विद्यापीठात उत्साहात

## विद्यार्थ्यांच्या आकर्षक सादरीकरणांनी भारावले वातावरण



कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा


शिवाजी विद्यापीठात शिवजयंतीचा सोहळा उत्साहात साजरा झाला. तरुणाईने काढलेली शोभायात्रा, लेझीम, ढोल व झांजपथकाचे उत्कृष्ट सादरीकरण, जरीपटक्याचे मिरविणे; यामुळे विद्यापीठ परिसर शिवमय झाला होता.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह मान्यवरांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर आणि मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कारांचे सादरीकरण केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. धनंजय सुतार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2024
पुढारी

# विद्यापीठास प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत २० कोटी निधी मंजूर

## पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते आज व्हीसीद्वारे उद्‌घाटन



शिवाजी विद्यापीठातून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारत सरकार शिक्षा मंत्रालय यांच्या वतीने प्रधान मंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम-उषा) योजनेतून शिवाजी विद्यापीठास २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. योजनेचे उद्‌घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २०) सकाळी ११ वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिगद्वारे होणार आहे.

पीएम-उषा योजनेतून देशभरातील विद्यापीठे, महाविद्यालये यांना आंतरशाखीय शिक्षण, रिसर्च युनिव्हर्सिटीज, ग्रँट स्ट्रेंदन युनिव्हर्सिटीज या घटकांसाठी सुमारे १२,९२६.१० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत विद्यापीठास २० कोटी रुपये मिळाले आहेत. उद्‌घाटन कार्यक्रम ऑनलाईन पाहण्याची व्यवस्था विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात केली आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2024
पुढारी

# विद्यापीठात आज डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार वितरण




**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून मराठी साहित्य समीक्षेमध्ये महत्त्वाचे योगदान देणारे ज्येष्ठ समीक्षक डॉ. रमेश वरखेडे (नाशिक) यांना २०२४ चा डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार मंगळवार (दि.२०) रोजी प्रदान करण्यात येणार आहे.

पुरस्कार वितरण समारंभ राजर्षी शाहू सिनेट सभागृहात दुपारी १.०० वाजता ज्येष्ठ लेखिका डॉ. तारा भवाळकर यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील.

दरवर्षी विद्यापीठाकडून समीक्षा ग्रंथास डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार देण्यात येतो. डॉ. पाटील यांचे मराठी समीक्षेत भरीव योगदान आहे. यावर्षीचा पुरस्कार डॉ. वरखेडे यांना प्रदान करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2024
पुढारी

# प्रधानमंत्री मुद्रा योजनेवर आज शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ डेव्हलपमेंट यांच्या वतीने 'प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे प्रभाव मूल्यांकन : पश्चिम महाराष्ट्रातील अंतर्दृष्टी' या विषयावर मंगळवार, दि.२० रोजी सकाळी १०.३० वाजता अर्थशास्त्र विभाग सेमिनार हॉलमध्ये एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र शाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख असणार आहेत. कुलभूषण उपाध्ये, जिल्हा अग्रणी व्यवस्थापक गणेश गोडसे, प्रा. डॉ. विद्या कट्टी, डॉ. प्रतिमा पवार व डॉ. नितीन माळी प्रमुख मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन 'वायसीएसआरडी'चे प्र- संचालक डॉ. नितीन माळी, प्रकल्प समन्वयक डॉ. कविता वड्राळे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2024
पुढारी

# उद्यापासून शिवस्पंदन महोत्सव

- विद्यार्थी विकास विभागाचे आयोजन
- ७५ वाद्ये, नकला, मूकनाट्य, लघुनाटिका सादरीकरण

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागातर्फे बुधवार (दि. २१) पासून तीन दिवस 'शिवस्पंदन महोत्सवा'चे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवात ७५ वाद्यांचा कलाविष्कार पाहायला मिळणार आहे.

बुधवारी सकाळी ९ वाजता मुख्य प्रशासकीय इमारत ते वि. स. खांडेकर भाषा भवन रॅलीने महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीत होईल. त्यानंतर दि. २१ व २२ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ दरम्यान सुगम गायन, लोकवाद्य वादन, मूकनाट्य, नकला, लघुनाटिकांचे सादरीकरण होईल.

शुक्रवार (दि. २३) रोजी बक्षीस वितरण समारंभ होईल. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. पी. टी. गायकवाड, महोत्सव समन्वयक डॉ. एन. ए. कांबळे यांनी केले आहे.

2 0 FEB 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात उद्यापासून राष्ट्रीय योग, निसर्गोपचार परिषद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे दि. २१ व २२ फेब्रुवारी रोजी मानव्यशास्त्र विभागाच्या सभागृहात दोन दिवसीय राष्ट्रीय स्तर योग व निसर्गोपचार परिषदेचे आयोजन केले आहे.

'योग व उपचाराचे नवे आयाम' हा परिषदेचा विषय आहे. देशभरातील विविध तज्ज्ञ मार्गदर्शकांची व्याख्याने होणार आहेत. योग, निसर्गोपचार, अॅक्युप्रेशर, आहार विषयावरील शोधनिबंधांचे सादरीकरण होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रा. डॉ. रामचंद्र पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2024
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात शिवजयंती उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात शिवजयंतीचा सोहळा उत्साही वातावरणात पार पडला. तरुणाईकडून उत्स्फूर्तपणे काढण्यात आलेली शोभायात्रा, लेझीम, ढोल व झांजपथकाचे उत्कृष्ट सादरीकरण यामुळे विद्यापीठाचा परिसर पूर्णपणे शिवमय होऊन गेला होता.

सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजास वंदन करण्यात आले. कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवरांनी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवरायांच्या भव्य पुतळ्यास पुष्प वाहून त्याचप्रमाणे शिवप्रतिमेसही पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. सरिता ठकार, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, डॉ. धनंजय सुतार, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर, डॉ. अवनिश पाटील, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. दत्तात्रय मचाले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 FEB 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठाला २० कोटींचा निधी मंजूर

**कोल्हापूर :** केंद्र सरकारच्या शिक्षा मंत्रालयातर्फे प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियानाअंतर्गत शिवाजी विद्यापीठाला २० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यातून पायाभूत सुविधा, साधन सामुग्रीचे अद्ययावतीकरण केले जाणार आहे. प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान या योजनेतून देशातील ७८ विद्यापीठांना १२९२६ कोटी रुपये इतका निधी मंजूर केला आहे. त्यापैकी शिवाजी विद्यापीठाला २० कोटी रुपये इतका निधी मंजूर झाला आहे. त्याचा उद्घाटन सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंगळवारी (ता.२०) सकाळी अकरा वाजता ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. दरम्यान, विद्यापीठाला मंजूर झालेला निधीतून पायाभूत सुविधा, नूतनीकरण, साधन-सामुग्रीसाठी प्रत्येकी तीस टक्के, तर शैक्षणिक गुणवत्तावाढीचे उपक्रम राबविण्यासाठी दहा टक्के रक्कम खर्च करण्याची तरतूद आहे.